# पुणे महानगरपालिका
# स्थायी समिती
# कार्यपत्रिका क्र.१, दि. ०५/४/२०२४
# सभा क्र.२, दि.१२/४/२०२४ चा वृत्तांत

पुणे महानगरपालिका स्थायी समितीची तहकूब सभा (दि.०५/०४/२०२४ रोजीची सभा) शुक्रवार, दिनांक १२/४/२०२४ रोजी, दुपारी ४.०५ (चार वाजून पांच मिनिटे) वाजता, स्थायी समिती सभागृह, पुणे महानगरपालिका भवन, पुणे येथे संपन्न झाली.

सदर सभेस पुढील अधिकारी उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| मा. डॉ.राजेंद्र भोसले | – | प्रशासक तथा महापालिका आयुक्त, पुणे मनपा |
| मा. पृथ्वीराज बी.पी. | – | अति.महा.आयुक्त (इ) |
| मा. महेश पाटील | – | उप आयुक्त, मालमत्ता व व्यवस्थापन, सामान्य प्रशासन, दक्षता |
| श्रीमती प्रतिभा पाटील | – | उप आयुक्त, भूसंपादन |
| मा.गणेश सोनुने | – | उप आयुक्त, भांडार |
| मा.संजय शिंदे | – | उप आयुक्त, परिमंडळ क्र.४ |
| मा. डॉ. वावरे | – | आरोग्य विभाग. |
| श्री.मुकुंद बर्वे | – | अभियंता, घनकचरा व्यवस्थापन |
| श्री.रमेश दांगट, श्री.उबंटकर | – | अग्निशमन अधिकारी |
| श्रीमती योगिता भोसले | – | प्रभारी नगरसचिव |

**मा.प्रशासक –** सभेला सुरूवात करावी.

## कार्यपत्रिकेवरील विषय

**घनकचरा व्यवस्थापन आढावा**

**विषय क्र. १**

**घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील १५ क्षेत्रीय कार्यालयाकडील माहिती (दि.०१/०३/२०२४ ते दि.३१/०३/२०२४ पर्यंत) चा अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा. उप आयुक्त, घनकचरा व्यवस्थापन यांचे जा.क्र.घ.क.व्य.का./८८,दि.०३/०४/२०२४ चे पत्र.**

**निर्णय–सदर अहवालाची नोंद घेण्यात आली.**

## माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्र.२**

**दिनांक ०४/०३/२०२४ ते १०/०३/२०२४अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत लागलेल्या एकूण ८५ आगींबाबत मा. अति.महा.आयुक्त(ज) यांनी जा.क्र.मआ/अग्निशमन/१९८७,दि.२८/०३/२०२४ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.**

**निर्णय–सदर अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**विषय क्र. ३**

**उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र.१, यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.०१/०३/२०२४ ते दि.१५/०३/२०२४ ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३(ड) नुसार मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणे बाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र मआ / परि.क्र.१ /१९८६, दि.२८/०३/२०२४ चे पत्र.**

**निर्णय–सदर विषयाचा विचार आचारसंहितेनंतर करण्यात यावा.**

**विषय क्र.४**

**उप आयुक्त, परिमंडळ क्र.२ कार्यालयाचे नियंत्रणाखालील औंध-बाणेर, शिवाजीनगर-घोलेरोड, व कोथरूड-बावधन क्षेत्रीय कार्यालयांकडील १४ मुद्द्यांबाबतची माहे फेब्रुवारी २०२४ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.- म आ / परि.क्र.२/१९८८,दि.२८/०३/२०२४ चे पत्र.**

**निर्णय– सदर अहवालाची नोंद घेण्यात आली.**

अशा पध्दतीने सभेचे कामकाज होऊन सभा समाप्त झाली.

**सही /–** XXX
(योगिता भोसले)
प्र.नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.

वृत्तांत मंजूर.

**सही /–** XXX
( डॉ.राजेंद्र भोसले )
प्रशासक तथा आयुक्त,
पुणे महानगरपालिका.